| (सीएनआर क्र. एमएचएसओ–२०००–०६५८–२०१०) | नियमित दिवाणी दावा क्र. १४२/२०१० |
|---|---|

## निशाण क्र. ८९ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादींनी मयत प्रतिवादी क्र. ४ हरीराम पांडुरंग गायकवाड यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ होणेसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जात वादींचे कथन असे आहे की, सदर दाव्याचे काम चालू असताना यातील प्रतिवादी क्र. ४ हरीराम पांडुरंग गायकवाड हे दि. १९/११/२०२४ रोजी मयत झाले आहेत. सदर वादी हे आजारी असल्याकारणाने त्यांना मे. न्यायालयात येऊन वारस अभिलेखावर घेणेबाबतचा अर्ज मुदतीत देता आला नाही. त्यामूळे प्रस्तुत वारस अभिलेखावर घेण्यास सुमारे ०५ महिने ३० दिवसांचा विलंब झालेला आहे. सदरचा विलंब वादीने मुळीच जाणुनबुजून केलेला नाही. सदर वारस अभिलेखावर न घेतल्यास सदरचा दावा हा स्थावर मिळकतीचा असल्याने वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सबब, विलंब माफ करण्यात यावा अशी वादींनी विनंती केली आहे.

३. सदरच्या अर्जास प्रतिवादी क्र. २ तर्फे म्हणणे देण्यात आले असून त्यात त्यांनी असे कथन केले आहे की, प्रस्तुत अर्ज हा खरा व कायदेशीर नाही. अर्जात नमूद केलेले कारण खोटे व बनावट आहे. सबब अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

४. उभय पक्षाचा युक्तीवाद ऐकला. वादींनी प्रतिवादींविरुध्द सरस निरस मानाने वाटप होऊन मिळण्यासाठी दावा दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जात वादी यांनी ते आजारी असल्याकारणाने त्यांना मे. न्यायालयात येऊन वारस अभिलेखावर घेणेबाबतचा अर्ज मुदतीत देता आला नाही असे कारण नमूद केले आहे. सदर कथनाच्या पृष्टयार्थ वादी यांनी नि.क्र. ९० वर शपथपत्र दाखल केले आहे. वादी यांनी निशाणी क्र. ९६ सोबत प्रतिवादी क्र. ४ यांचे मृत्यू

प्रमाणपत्र दाखल केलेले आहे. सदर मृत्यूप्रमाणपत्राचे अवलोकन करता प्रतिवादी क्र. ४ हे दि. १९/११/२०२४ रोजी मयत झाल्याचे स्पष्ट होत आहे. वादींच्या अर्जातील कथन तसेच दाव्यातील मागणी पाहता दाव्याचा निर्णय गुणदोषावर होणेसाठी प्रतिवादी क्र. ०४ यांच्या वारसांना अभिलेखावर घेणेची संधी देणे हे न्यायाचे ठरेल. जर वादींना प्रतिवादी क्र. ०४ यांचे वारस अभिलेखावर घेणेची संधी देवून त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिली नाही तर ते त्यांचे न्याय हक्कापासून वंचित राहू शकतात. परंतू, वादींनी प्रतिवादी क्र. ०४ यांच्या वारसांना मुदतीत अभिलेखावर समावेश न केल्यामुळे प्रस्तुतचे प्रकरण निष्कारण प्रलंबित राहिले. त्यामुळे सदरच्या बाबीसाठी वादी यांच्यावर खर्चाचे आदेश पारीत करुन प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. वरील सर्व कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो,

**आदेश**

१. अर्ज वादींनी रक्कम रुपये ५००/- (रुपये पाचशे फक्त) प्रतिवादी यांना खर्च देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. वादींनी उपरोक्त नमूद अटीची पुर्तता केल्यानंतर प्रतिवादी क्र. ४ हरीराम पांडुरंग गायकवाड यांचे वारस अभिलेखावर घेणेसाठी झालेला विलंब माफ करण्यात येतो.

PRACHI RAVINDRA KULKARNI
Digitally signed by PRACHI RAVINDRA KULKARNI
Date: 2026.07.16 15:19:26 +0530

**( श्रीमती पी. आर. कुलकर्णी )**
सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
सांगोला.

दिनांक – १६/०७/२०२६

**प्रमाणपत्र**

मी खात्री देतो की, सदर आदेशाच्या / न्यायनिर्णयाच्या पीडीएफ फाईलमधील मजकूर हा मूळ आदेश / न्यायनिर्णयाप्रमाणेच शब्दशः आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | वि. अ. डांगे |
| न्यायालय | : | सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, सांगोला. |
| आदेश / न्यायनिर्णयाचा दिनांक | : | १६/०७/२०२६ |
| पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेली दिनांक | : | १६/०७/२०२६ |
| निकाल अपलोड केलेले दिनांक | : | १६/०७/२०२६ |